Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/परीक्षा/3033
दिनांक : 04 OCT 202

प्रति,
मुख्याध्यापक/ प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय:- फेब्रु-मार्च 2024 मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेचे प्रमाणपत्र वाटपाबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, आपल्या माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत फेब्रु-मार्च 2024 मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र संबंधित वितरण केंद्रावर शुक्रवार दि.11/10/2024 रोजी सकाळी 11.00 ते सायंकाळी 4.00 पर्यंत हस्तपोहोच वाटप करण्यात येणार आहे. तरी सदर दिवशी आपल्या माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयाच्या अधिकृत प्रतिनिधीस पत्रासह वितरण केंद्रावर पाठविण्याची व्यवस्था करावी. ज्या माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय दि.11/10/2024 रोजी वितरण केंद्रावरुन प्रमाणपत्र स्विकारणार नाहीत त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

सदर सर्व प्रमाणपत्र आपल्याच माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे आहेत याची खात्री करावी. अन्य माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र प्राप्त झाले असतील तर ते सिलबंद करुन आपल्या प्रतिनिधीमार्फत त्वरित या कार्यालयाकडे जमा करण्यात यावेत. तसेच आपल्या माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयातील एखाद्या विद्यार्थ्याचे प्रमाणपत्र प्राप्त न झालेस दि.15/10/2024 अखेर मंडळ कार्यालयास लेखी कळविण्यात यावे. तद्नंतर काही त्रूटी राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

फेब्रु-मार्च 2024 मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्रांचे आपल्या माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयात शुक्रवार दि.11/10/2024 रोजी सायंकाळी 4.00 वाजता वाटप करण्यात यावे.

प्रमाणपत्रांमध्ये काही त्रूटी असल्यास दुरुस्तीसाठीचे प्रस्ताव प्रमाणपत्र मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत (दि.10/11/2024 अखेर) मंडळ कार्यालयात समक्ष सादर करण्यात यावेत. दुरुस्ती प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे आवश्यक आहेत-

अ) प्रती प्रमाणपत्रातील प्रत्येक चूकीच्या नोंदीसाठी रु.200/- आणि नवीन प्रमाणपत्रासाठी रु.200/- असे एकूण रु.400/- शुल्क भरावे लागेल.
ब) माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या जनरल रजिस्टरमधील संबंधित विद्यार्थ्यांच्या नावाची नोंद असलेल्या पानाची मुख्याध्यापक/ प्राचार्यांनी प्रमाणित केलेली छायांकीत प्रत
क) दुरुस्ती यापूर्वीच म्हणजेच प्रिलिस्ट, प्रवेशपत्रे आणि गुणपत्रिका प्राप्त झाल्यानंतर का कळविली नाही याबाबत संबंधित मुख्याध्यापक/ प्राचार्य व लिपिक यांचा मा.विभागीय सचिव यांच्या नावे वस्तुनिष्ठ खुलासा सादर करावा.

आपल्या माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्रमाणपत्र दुरुस्तीचे परिपूर्ण प्रस्ताव विहीत मुदतीत मंडळ कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच दुरुस्तीची कार्यवाही केली जाईल. तद्नंतर काही त्रूटी राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर